**L. A. BILL No. XXII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१७ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ ची सुधारणा.

२०१७चा महा. ६.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (३६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(३६क) "महासार्क" याचा अर्थ, कलम ७७क मध्ये विनिर्दिष्ट केलेली महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद, असा आहे ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील,—

(१) खंड (८०) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(८०क) केंद्र सरकारद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आणि राज्य शासनाने स्वीकारलेल्या कोणत्याही शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे;";

(२) खंड (८१) मध्ये, "शासनाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे" या मजकुरानंतर, "आणि या अधिनियमान्वये दिलेल्या अन्य कोणत्याही निदेशांचे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१२) मधील, "कुलपतीची" या मजकुराऐवजी, "व्यवस्थापन परिषदेची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४क) कुलगुरूस, जेव्हा अधिष्ठात्याचे पद रिक्त असेल तेव्हा किंवा जेव्हा अधिष्ठाता आजारी असल्यामुळे किंवा अनुपस्थित असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी असमर्थ असेल तेव्हा, अधिष्ठाता त्याच्या पदावर पुन्हा रुजू होईपर्यंत, किंवा यथास्थिति, नवीन अधिष्ठाता कर्तव्य ग्रहण करेपर्यंत, अधिष्ठाता म्हणून काम करण्यासाठी, अधिष्ठाता म्हणून, नियुक्ती करण्याकरिता अर्हताप्राप्त असलेल्या सुयोग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मधील, पोट-कलम (२) मध्ये, "तीन महिने" या मजकुराऐवजी, "सहा महिने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ मध्ये नवीन कलम ७७क समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद.

"**७७क.** (१) उच्च शिक्षणातील शिक्षण व संशोधन विषयक बाबींच्या बाबतीतील धोरणे तयार करण्यासाठी आयोगास आणि त्याच्या व्यवस्थापन मंडळास सल्ला देण्यासाठी आणि तसेच शैक्षणिक बाबींमध्ये विद्यापीठांना निर्देश देण्यासाठी, महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद (महासार्क) या नावाने संबोधण्यात यावयाची एक परिषद असेल.

(२) महासार्कची रचना, कार्ये व कर्तव्ये आणि तिच्या बैठकांतील कामकाज चालविण्याची कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील, त्याप्रमाणे असतील.

(३) महासार्क तिच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, आयोगास सादर करील.

(४) सर्व शैक्षणिक बाबींच्या बाबतीतील महासार्कचे निर्देश, हे विद्यापीठांच्या विद्यापरिषदेवर, विद्याशाखेवर व अभ्यास मंडळावर बंधनकारक असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम ६ याच्या कलम १०० ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १०० मधील, पोट-कलम (५) मध्ये, खंड (क) मध्ये, परंतुका मध्ये "कुलपती" या मजकुराऐवजी, "शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) अधिनियमित केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता आणि विद्यापीठाचे प्रशासन, संरचना याचे बळकटीकरण करण्यासाठी आणि उच्च शिक्षण व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी, त्यास सक्षम करण्यासाठी, उक्त अधिनियमात सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) केंद्र सरकारने विहित केलेल्या आणि राज्य शासनाने स्वीकारलेल्या कोणत्याही शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ५ मध्ये सुधारणा केली आहे;

(दोन) कुलगुरूच्या शिफारशीवरून व्यवस्थापन परिषदेद्वारे प्र-कुलगुरूला पदावरून दूर करण्याची तरतूद करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१२) मध्ये सुधारणा केली आहे;

(तीन) आजारपणाच्या किंवा अनुपस्थितीच्या कारणामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे अधिष्ठात्याचे पद रिक्त झाल्यास, अधिष्ठात्याची सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, इतक्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद करण्यासाठी पोट-कलम (४क) समाविष्ट करण्याकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १५ मध्ये सुधारणा केली आहे;

(चार) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगास आणि त्याच्या व्यवस्थापन मंडळाला सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद घटित करण्याची तरतूद करण्याकरिता, उक्त अधिनियमात कलम ७७क समाविष्ट केले आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २, कलम ६२ चे पोट-कलम (२) आणि कलम १०० यांमध्ये सुयोग्य ती सुधारणा करणे देखील शासनास इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १३ मार्च, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ७(२).**—या खंडान्वये, महासार्कची रचना, कार्ये व कर्तव्ये आणि तिच्या बैठकींतील कामकाज चालविण्याची कार्यपद्धती नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२६ चे वि.स.वि. क्र. २२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६.**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे]**

**(सन २०१७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६. )**

**१. ते ४.** *** *** ***

**५.** विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील— पीद्याठाचे अधिकार व कर्तव्ये.

(१) ते (८०) *** *** ***

(८१) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात, राज्य शासनाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते पार पाडणे ;

(८२) व (८३) *** *** ***

**६. ते १२.** *** *** ***

**१३.** (१) ते (११) *** *** *** प्र-कुलगुरू.

(१२) जर कुलपतीची अशी खात्री पटली असेल की, प्र-कुलगुरू हा,—

(क) भ्रमिष्ट झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले आहे; किंवा

(ख) त्याला नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल न्यायालयाकडून दोषी ठरवण्यात आले आहे; किंवा

(ग) तो अमुक्त नादार झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले आहे; किंवा

(घ) तो शारीरिकदृष्ट्या अपात्र झाला आहे आणि दीर्घकाळच्या आजारामुळे किंवा विकलांगतेमुळे त्याची कार्ये पार पाडण्यात तो असमर्थ झाला आहे; किंवा

(ङ) या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्याचे त्याने बुद्धिपुरस्सर वर्जिले आहे किंवा पालन करण्याचे बुद्धिपुरस्सर नाकारले आहे किंवा सेवेच्या कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग केला आहे किंवा पोट-कलम (५) अन्वये राज्य शासनाने विहित केलेल्या कोणत्याही अन्य अटींचा भंग केला आहे किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरूपयोग केला आहे किंवा त्या प्र-कुलगुरूला पदावर पुढं चालू ठेवणे, विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानीकारक आहे ; किंवा

(च) तो कोणत्याही पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य आहे किंवा त्या पक्षाशी वा संघटनेशी अन्य प्रकारे संबंधित आहे, किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात भाग घेत आहे किंवा त्यासाठी मदतीदाखल वर्गणी देत आहे,

तर, कुलगुरूच्या शिफारशीवरून प्र-कुलगुरूला त्याच्या पदावरून दूर करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी, कोणताही पक्ष राजकीय पक्ष आहे किंवा कोणतीही संघटना राजकारणात भाग घेते किंवा कोणतीही चळवळ किंवा कार्य या खंडाच्या व्याप्तीमध्ये येते किंवा कसे यासंबंधातील कुलगुरूचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, खंड (घ), (ङ) आणि (च) अन्वये प्र-कुलगुरूला पदावरून दूर करण्यापूर्वी, कुलपती कडून प्र-कुलगुरूला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(१३) *** *** ***

**१४. ते ६१.** *** *** ***

प्राधिकरणांच्या सदस्यांचा पदावधी.

**६२.** (१) *** *** ***

(२) प्राधिकरणाची मुदत संपण्याच्या किमान ३ महिने अगोदर निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल आणि ती त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबरच्या आत पूर्ण करण्यात येईल.

"परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर विद्यापीठ प्राधिकरणांच्या प्रारंभिक मुदतीसाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया ३१ मे २०१८ च्या नंतर नाही अशा मुदतीत पूर्ण करण्यात येईल. ".

**६३. ते ९९.** *** *** ***

**९९क.** *** *** ***

इमारत व बांधकाम समिती.

**१००.** (१) ते (४) *** *** ***

(५) इमारत व बांधकाम समिती,—

(क) व्यवस्थापन परिषदेच्या निदेशान्वये आणि संपूर्ण अधीक्षणाखाली, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या अभिकरणामार्फत करावयाच्या मोठ्या बांधकामांसह सर्व प्रकारची कामे करून घेण्यासाठी जबाबदार असेल :

" परंतु, जर महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमार्फत काम करावयाचे असेल तर, कुलपती, व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वमान्यतेने, विद्यापीठाने तयार केलेल्या, महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या, तीन अनुभवी व ख्यातनाम सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या नामिकेमधून अशा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची निवड करील ;" .

(ख) ते (ढ) *** *** ***

(६) ते (८) *** *** ***

**१०१. ते १४८.** *** *** ***

**अनुसूची** *** *** ***

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२. ]

[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]

[ श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

जितेंद्र भोळे,
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.